# नेपच्युनचा मॅग्नेट मॉल 'बियॉण्ड स्क्वेअरफीट'कडे

**मुंबई :** मॉलच्या संकल्पनेपासून व्यवस्थापनापर्यंत विविध टप्प्यांवर उद्‌भवणाऱ्या अडचणींवर उपाययोजना सुचविण्यात अग्रेसर असलेल्या 'बियॉण्ड स्क्वेअरफीट'ने नेपच्युन समूहाच्या मॅग्नेट मॉलचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पटकाविला आहे. या मॉलमध्ये भाडेतत्त्वावर समाविष्ट केल्या जाणाऱ्या जागांचे आरेखन; तसेच या संबंधीच्या दिशानिर्देशांबरोबरच मार्केटिंग आणि प्रोत्साहनात्मक अन्य उपाययोजनांबाबतही बियॉण्ड स्क्वेअरफिटकडून सल्ला दिला जाणार आहे.

बियॉण्ड स्क्वेअरफीट ॲडव्हायजरी ही बुटिक मॉल सल्लागार कंपनी आहे. मुंबईसारख्या मेट्रोपॉलिटीयन शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात मॉल्स संस्कृती उदयास आली आहे; परंतु चुकीचे व्यवस्थापन आणि अयोग्य मूल्य संकल्पनेमुळे हे मॉल्स अपयशी ठरल्याचे पाहायला मिळते आहे. यातून मॉल व्यवस्थापनाला बाहेर काढण्यासाठी स्क्वेअरफिट ॲडव्हायजरीने मॉल्सची कामगिरी आणि नफाक्षमता सुधारण्यासाठी लक्ष्य निर्धारित करीत वाटचाल सुरू केली आहे. भांडुप येथे १० लाख ५६ हजार चौरस फूट क्षेत्रफळावर मॅग्नेट मॉल उभारण्यात येणार आहे. १० मल्टिप्लेक्स स्क्रिन्स आणि मुंबईतील सर्वांत मोठ्या फूड कोर्टचा त्यात समावेश असेल.